तंत्रज्ञानाच्या जोडणीतून होऊ शकतो भाषेचा विकास

डॉ. भूषण भावे : केपे महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

केपे, दि. २० : आजच्या संगणकीय युगांत भाषेचा खरा विकास साधायचा असेल तर प्रत्येक भाषा तंत्रज्ञानाशी जोडणे गरजेचे आहे, कारण त्यामुळेच भाषेचा सर्वांगीण विकास होऊ शकतो, असे प्रतिपादन विद्या प्रबोधिनी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. भूषण भावे यांनी केले. एम. ए. कोंकणी विभाग सरकारी महाविद्यालय, केपे आणि राजभाषा संचालनालय, गोवा सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते. 'कोंकणीचो संगणकी वापर' या विषयावर केले महाविद्यालयाच्या परिसंवाद कक्षात ही कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी एम. ए. कोंकणी विभागाचे संयोजक प्रा. सुशांत नाईक यांनी प्रास्ताविक केले तर हिंदी विभागाचे विभागप्रमुख डॉ, ब्रिजपालसिंग गेहलोत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. याप्रसंगी कार्यशाळेचे सहआयोजक आणि कार्यक्रमाचे खास आमंत्रित म्हणून राजभाशा संचालनालयाचे संचालक प्रशांत शिरोडकर यांनी राजभाषा संचालनालयाच्या कार्यावर प्रकाश टाकला. तर बी. ए. कोंकणी विभागाच्या प्रभारी डॉ. राखी आमोणकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पणजी : संचालक प्रशांत शिरोडकर यांचा सन्मान करताना हिंदी विभागाचे विभागप्रमुख डॉ, ब्रिजपालसिंग गेहलोत. सोबत प्राचार्य प्रो. डॉ. भूषण भावे व मान्यवर.

यावेळी राजभाशा संचालनालयाच्या अनुवादक स्नेहा सबनीस, कोंकणी विभागाचे प्राध्यापक जोफा गोन्सालवीस, प्रा. ग्लिनीस डायस, प्रा, दीपराज सातोर्डेकर, प्रा. शमिका बाळ्ळीकर, प्रा. जोस्मिता फर्नांडिस आणि प्रा. सानिका च्यारी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यशाळेच्या समारोप सोहळ्यात फादर रोमन रॉड्रिगीस आणि प्रा. नलिशा वेळीप यांनी कार्यशाळेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. सहभागी झालेल्या सर्व प्राध्यापकांना स्नेहा सबनीस यांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली. कार्यशाळेचे संपूर्ण आयोजन प्रा. सुशांत नाईक यांनी केले होत तर एम. ए. कोंकणी विभागाचे विद्यार्थी साईशा शेठ शिरोडकर, कृपेश गांवकर, सायली आमोणकर आणि सेजल तळसेकर यांनी सूत्रसंचालन केले.

कार्यशाळेतील ठळक बाबी

पाठ्यक्रमाविषयीची संपूर्ण ओळख करून देताना संकणकाचा भाषेसाठी कसा वापर करता येतो आणि तो कसा करावा यावर प्रा. सुशांत नाईक यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात देवनागरीत टंकलेखन कसे करावे आणि टंकलेखनावेळी येणाऱ्या अडचणी कशा दूर कराव्यात यावर स्नेहा सबनीस यांनी प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले.

भाषिक तंत्रज्ञानाची आवड हवी : प्रा. सुशांत नाईक

भाषेचा विकास करण्यासाठी विद्यार्थ्यांना भाषिक तंत्रज्ञानाकडे वळविणे महत्त्वाचे आहे.अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये भाषेच्या तंत्रज्ञानाची आवड निर्माण केली पाहिजे. वेगवेगळ्या महाविद्यालयांनी कार्यशाळांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे, असे उद्‌गार प्रा. सुशांत नाईक यांनी काढले.

भाषेच्या प्रमाण लेखनाचे ज्ञान गरजेचे: स्नेहा सबनीस

देवनागरी टंकलेखन शिकताना कोंकणी भाषेच्या प्रमाणलेखनाचे ज्ञान असणे गरजेचे आहे. कोंकणी भाषेच्या तंत्रज्ञानाच्या वापरात भारतातल्या वेगवेगळ्या संस्थांचा सहभाग असून आपल्या भाषेच्या संगणकीकरणासाठी विद्यार्थ्यांना देवनागरी टंकलेखन शिकविणे आवश्यक आहे, असे राजभाषा संचालनालयातील अनुवादक स्नेहा सबनीस यांनी सांगितले.

पान १ वरून

गोव्यात स्वस्त प्रॉपर्टी देण्याचे आमिष दाखवून ५०० जणांना लुटले

निर्माण करण्यासाठी महिला ऑपरेटर्सना देखील नियुक्त केले होते. आयपीएस प्रोबेशनर मयंक दुबे आणि अरुण बालगोटा यांच्या देखरेखीखाली, झालेल्या तपासात या घोटाळ्याची गुंतागुंत उघड झाली. जाहिरात करण्यासाठी या टोळीने वेगवेगळ्या आकर्षक अशा बंगल्यांचे फोटो वापरले. हे फोटो त्यांनी इंटरनेटवरून घेतले. जाहिरातीत आकर्षक किमती देऊ केल्या. अनेक ग्राहकांना त्यांचे बुकिंग सुरक्षित करण्यासाठी १०,००० ते २० हजार रुपयांपर्यंतचे आगाऊ शुल्क भरण्यास सांगून फसवले गेले, अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी या ऑपरेशनमध्ये वापरलेली किमान १५ बँक खाती ओळखली आहेत, त्यापैकी बहुतेक गोठवण्यात आली आहेत. हा घोटाळा अनेक कोटींचा असल्याचे मानले जात आहे, असे कौशल म्हणाले. यानिमित्ताने पोलिस अधीक्षकांनी जनतेला ऑनलाईन मालमत्ता बुक करताना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे . ग्राहकांनी ते बुक करत असलेल्या मालमत्तेची आणि ते ज्या व्यक्तीशी व्यवहार करत आहेत त्याची सत्यता पडताळणे महत्त्वाचे आहे,असे कौशल यांनी सांगितले आहे.

सरपंचाने केलेल्या अनधिकृत बांधकामाची पाहणी

एलिव्हेशन प्लॅन, तांत्रिक मंजुरी, जमीन रूपांतरण सनद, बांधकाम परवाना आणि इतर आवश्यक मंजुरी यासारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांचा अभाव आहे. डायस यांचा दावा आहे की तात्पुरत्या झोपडीसाठी असलेल्या एनओसीचा वापर ग्राउंड प्लस टू फ्लोअर्स असलेली मोठी इमारत बांधण्यासाठी आधार म्हणून केला गेला होता, जो आता व्यावसायिक कारणांसाठी वापरला जात आहे. डायस यांनी या विसंगती बीडीओच्या निदर्शनास आणून दिल्या, ज्यामुळे आरोपांची अधिक चौकशी करण्यासाठी सोमवारी तपासणी करण्यात आली.

डोनाल्ड ट्रम्प बनले दुसऱ्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यध

यावेळी म्हणाले. डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्याला ७०० पाहुणे उपस्थित होते. भारतातून उद्योगपती मुकेश अंबानी आणि नीता अंबानी आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी हजेरी लावली. याशिवाय इलॉन मस्क, जेफ बेझोस, मार्क झुकरबर्ग आणि टिम कुक, सॅम ऑल्टमन आणि टिकटॉकचे प्रमुख शौ जी च्यु हे देखील यावेळी सहभागी झाले होते. दुसरीकडे, पद सोडण्याच्या काही तास आधी, राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी सोमवारी अनेक लोकांना आगाऊ माफी दिली. यामध्ये डॉ. अँथनी फौसी, जनरल मार्क मिले आणि ६ जानेवारी रोजी झालेल्या कॅपिटल हिल हल्ल्याची चौकशी करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीचे सदस्य यांचा समावेश आहे. हे सर्वजण ट्रम्प यांचे विरोधक मानले जातात.

डिचोलीत वन खात्याच्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २० : गेल्या अनेक काही महिने धबधबा डिचोली येथे सातत्याने संसार करणारा बिबटा रविवारी रात्री वन खात्याच्या पिंजऱ्यात अडकला. त्यानंतर वनखात्याचे अधिकारी तातडीने दाखल होऊन त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आल्याची माहिती वन खात्याचे विभागीय वन अधिकारी सेबेस्तीयन रॉड्रिग्ज यांनी दिली.

गेली अनेक महिने धबधबा येथे लोकांच्या मागणीनुसार पिंजरा ट्रॅप लावला होता. यापूर्वी बिबट्याने अनेक कुत्री तसेच वासरांची शिकार केली होती. तसेच वारंवार लोकवस्तीत तो दिसत होता. रविवारी रात्री अकरा साडे अकराच्या सुमारास सदर बिबट्या पिंजऱ्यात सापळ्यात अडकला. त्यानंतर स्थानिक आणि वन विभागाला माहिती देतात वन अधिकारी

विभागीय वनअधिकारी सेबेस्तीयन रॉड्रिग्ज यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागाचे रश्मीन मुळगावकर, पुंडलिक कलंगुटकर,राज मळीक, बंडू राणे, विष्णू राणे विश्रांत नाईक या टीमने घटनास्थळी धाव घेतली.

सदर जेरबंद बिबट्याला सोमवारी त्याची नैसर्गिक अधिवासात रवांगी करण्यात आली. काही दिवसांपूर्वी साष्टी वाडा बोर्डे डिचोली येथे प्रशांत चणेकर यांच्या घरासमोर रस्त्यावर एक बिबट्या वाहनाची धडक झाल्याने जखमी झाला होता. तो बिबट्या तीन दिवसांपूर्वी सर्व नेते रस्ता क्रॉस करताना दिसला होता. त्यामुळे या भागात बिबट्यांचा वावर सुरूच असून वन खात्याने शास्तीवाडा येथे कॅमेरा ट्रॅप लावलेला आहे.



बायंगिणी कचरा प्रकल्प रद्द करा

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २० : जुने गोवा पंचायतीने बायंगिणी येथील प्रस्तावित कचरा व्यवस्थापन प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली असून, सरकारने हा प्रस्ताव पुढे नेल्यास स्थानिक आंदोलन छेडतील, असा इशारा दिला आहे.

जुने गोवेच्या सरपंच मेधा पर्वतकर यांच्यासह अन्य पंच सदस्य व नागरिकांनी शनिवारी पत्रकार परिषदेत सांगितले की, २००२ पासून या प्रकल्पाला विरोध सुरू आहे. आम्हाला हा प्रकल्प नको आहे. २००२ पासून आम्ही याला विरोध करत आहोत. जुन्या गोव्यात चर्चसह जागतिक वारसा स्थळ आहे. मंदिरे आणि मठ, चार शाळा आणि एक रुग्णालय आहे. या प्रकल्पामुळे प्रदूषण होईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. या प्रस्तावासाठी झालेल्या जनसुनावणीत ९० टक्क्यांहून अधिक लोकांनी प्रकल्पाला विरोध दर्शविला होता, अशी माहिती पंचसदस्य अंबर आमोणकर यांनी दिली. पक्षाचा दबाव असूनही स्थानिक आमदार राजेश

▶ जुने गोवे पंचायतीची मागणी : स्थानिकांचा आंदोलनाचा इशारा

फळदेसाई याप्रश्नी माघार घेणार नाहीत, असेही ते म्हणाले. कदंब पठार जिथे हा प्रकल्प प्रस्तावित आहे, तो भाग सर्वात वेगाने वाढणारा आहे आणि काहीजण त्याला अप्पर पणजी' असेही म्हणतात. प्रस्तावित जागा भूवैज्ञानिक परिसंस्थेच्या शीर्षस्थानी आहे. यामुळे पाणी दूषित होणे, हेरिटेज नष्ट होणे, इको सेन्सिटिव्ह झोन नष्ट होणे अशा समस्या निर्माण होतील. पठाराच्या पायथ्याशी असलेल्या भागात राहणाऱ्या लोकांना याचा फटका बसणार आहे.

प्रकल्पाबाबत मार्च २०२४ च्या राजपत्रित अधिसूचनेत विसंगती असल्याचेही त्यांनी सांगितले. पाचव्या पानावर १०० टनांचा प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव आहे, तर ११ व्या पानावर २५० टनाचा प्रकल्प उभारण्याचा उल्लेख आहे.

क्षमतेबाबत सरकार अस्पष्ट आहे. त्यामुळे ही संपूर्ण योजना रद्द करावी लागणार आहे. प्रस्तावित जागेच्या परिघात रहिवासी क्षेत्र असून तेथे तीन हजारांहून अधिक लोक राहतात.कचरा प्रक्रिया केंद्राच्या पाच किलोमीटरच्या परिघात असलेल्या साळगावच्या जनतेचे कसे हाल होत आहेत, हे आपण पाहिले आहे. त्याऐवजी सरकारने अशा कचऱ्याचे विकेंद्रीकरण करावे. वेर्णा आणि बायंगिणी येथे ५०० कोटी रुपयांचे प्रकल्प उभारण्याऐवजी प्रत्येक मतदारसंघात २५ कोटी रुपये खर्च येणार आहे.चारवेळचे पंचसदस्य तथा माजी सरपंच विनायक फडते म्हणाले की, ते पंच सदस्य होण्यापूर्वीच प्रकल्पाच्या जागेला विरोध होत होता. त्यावेळी हा रहिवासी भाग नव्हता, पण असे असूनही अनेक गृहप्रकल्पांना सरकारनेच मंजुरी मिळवून दिली. आता प्रत्येकी २५० ते ४०० फ्लॅटचे प्रकल्प आहेत. बफर झोन नसलेल्या या प्रकल्पाच्या जागेच्या हद्दीला संकुले जवळजवळ स्पर्श करीत आहेत. त्याऐवजी संबंधित मंत्र्यांनी आधी प्रस्तावित केलेल्या ताळगाव येथील जागेवर हा प्रकल्प घेऊन जावे. मुख्यमंत्र्यांना आम्ही अनेकवेळा लेखी विनंती केली आहे, त्यांनी आमचे गांभीर्य समजून घ्यावे.

आंबिये महाविद्यालयात उद्यापासून माहिती विश्लेषणावर ई कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

पर्वरी, दि. २० : संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय विर्नोडा येथील वाणिज्य विभागातर्फे एसपीएसएस आणि स्मार्ट पीएलएस वापरून परिमाणात्मक माहितीचे विश्लेषण या विषयावर राष्ट्रीय पातळीवरील ई कार्यशाळा उद्या दि.२२ ते २४ या दरम्यान आयोजित केली आहे. या राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेत वीर नर्मद दक्षिण गुजरात विद्यापीठ, सुरत येथील प्रा.डॉ. धवल मेहता मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा दि. २२ ते २४ जानेवारी या दरम्यान सायंकाळी ५ ते ७ यावेळेत ऑनलाईन स्वरूपात असल्याची माहिती कार्यशाळेचे मुख्य समन्वयक डॉ. वीरेंद्र आमोणकर यांनी दिली. दि. २२ रोजी पॅरामेटिक टेस्ट इन एसपीएसएस, दि. २३ रोजी नॉन पॅरामेटिक टेस्ट इन एसपीएसएस, दि. २३ रोजी स्ट्रक्चरल इक्युशेन मॉडेलिंग यूजिंग स्मार्ट पीएलएस या विषयांवर प्रा.डॉ. धवल मेहता मार्गदर्शन करतील, असेही डॉ. वीरेंद्र आमोणकर म्हणाले. प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर, उपप्राचार्या डॉ. ल्युसी जेम्स यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा डॉ. वीरेंद्र आमोणकर यांनी आयोजित केली असून प्रा.साक्षी गावस आणि प्रा.ईश्वरी कळंगुटकर या कार्यशाळेच्या सहसमन्वयक आहेत.

उत्पादनात घट, रोगाचा परिणाम ; नारळाचे भाव कडाडले

■ टीम दैनिक हेराल्ड

काणकोण, दि. २० : उत्पादनात झालेली घट, रोगामुळे उत्पादनावर झालेला परिणाम, शेजारील राज्यांतून होणारी आयात खालावल्यामुळे गोमंतकीयांच्या दैनंदिन आहारातील महत्त्वाचा घटक असलेल्या प्रत्येक सणासुदीला वापरल्या जाणाऱ्या नारळाचे भाव बरेच कडाडले आहेत. आगामी काही दिवसात तो आणखी वाढण्याची शक्यता व्यावसायिकांकडून वर्तवली जाते. नारळाला दुसरा पर्याय नसल्याने वाढलेल्या किमतीत तो खरेदी करण्याची वेळ काणकोणवासीयावर येऊन ठेपली आहे.

सध्या काणकोण बाजारात सर्वात लहान आकाराचे नारळ प्रतिनग २५ रूपये दराने विकला जातो. तर मध्यम आकाराचा नारळ ३५ ते ४० रूपये नग आणि मोठ्या आकाराचा नारळ ५० रूपये प्रती नग यापुढील दराने मिळतो. नारळाच्या उत्पादनात घट होण्यास विविध कारणे आहेत. मात्र एक बागायतदार विजय पै खोत यांनी दिलेल्या माहितीनुसार माकडांकडून नारळाच्या बागायतीची, फळाची केली जाणारी नासधूस हे मुख्य कारण मानले जात आहे. तसेच यंदा लांबलेल्या पावसाचा फटका पिकाला बसला असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. नारळ महागल्याचा परिणाम दैनंदिन जीवनावर झाला आहे. याशिवाय इतर खाद्यपदार्थही याचा विपरित परिणाम शक्यताही व्यक्त करण्यात येत आहे. खास करून हॉटेलांतील खाद्यपदार्थाचे दर वाढले आहेत. त्याचाही फटका ग्राहकांना भोगावा लागतो आहे. गोव्यात इतर राज्यांतून आयात करण्यात येणाऱ्या नारळाच्या प्रमाणात बरीच घट झाली आहे. शेजारील राज्यांतील उत्पादक नारळापेक्षा शहाळ्यांची विक्री करण्यास पसंती देत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे नारळापेक्षा शहाळी आयातीच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

झांट्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे प्रात्यक्षिके

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २० : डिचोली येथील नारायण झांटये वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आणि डिचोली ट्राफीक सेल यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या विद्यार्थांना वाहतूक नियमांचे पालन यावर धडे देण्यात आले. यावेळी ट्राफीकचे गौरेश परब यानी विद्यार्थांना व्हिडिओद्वारे युवक वा युवती गाडी चालवताना कुठे चूक करतात व त्याचा परिणाम अपघातात होऊ

▶ डिचोली ट्राफीक सेल चा सामाजिक उपक्रम

शकतो यांची प्रात्यक्षिके दाखविली. तसेच युवकांनी नियमांचे पालन कसे करावे व आपला व दुसऱ्याचा जीव कसा सांभाळावा, याची माहीती दिली आली. यावेळी व्यासपिठावर ट्राफिकचे हेडकॉन्स्टेबल पुंडलिक सावंत, सुर्यकांत कवठणकर, सिध्देश गावस, मदन पाटील, राहुल रतील तसेच प्राचार्य राजेंद्र कुंभारजुवेकर, एन एस एस अधिकारी प्रा सोना पांगम, प्रा अजिता हरमलकर आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

ट्राफिक सेल रस्ता सुरक्षा

जागरुकता सप्ताहाचे औचित्य साधून वाहतूक नियमांचे पालन आजच्या युवकांचे कर्त्यव्य बनले आहे ते कर्त्यव्य बजावताना युवकांनी नियम स्वतः पाळावे व इतराना मार्गदर्शन करावे, असे परब यांनी सांगितले.

यावेळी गौरेश परब, पुंडलिक सावंत यानी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकाचे निरसन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सोना पांगम, स्वागत प्रा. शेरीन शेख व आभार प्रा. अजिता हरमलकर यांनी केले .

कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता कॉलेजचे कर्मचारी ज्ञानेश्वर राऊत, निखिल आरोंदेकर, सिद्धेश गावस, भिकाजी सावंत यांनी विशेष परिश्रम घेतले.

IN THE COURT OF JOINT MAMLATDAR VI OF BARDEZ TALUKA AT MAPUSA, GOA

Mutation Case No: 96076, 96077,96078 Village: Camurlim

Ophelia Cabral, R/o 202, Nazareth Niketan, Dr. Charat Singh Colony Road, Andheri (East) Mumbai 400093 .....Applicant

V/s

1. Epifanio Rangel alias Epifanio Caitano Rangel alias Rejel D'Cruz 2. Eujene Rangel 3. Jacinta Rangel alias Jessie Rangel 4. Jane D'Cruz 5. Jeanette Rangel 6. Mathew D'Cruz 7. Tony Rangel ....Opponents

PUBLIC NOTICE

To all Opponents / Legal Heirs / any other interested parties

Whereas the applicant Ophelia Cabral, R/o 202, Nazareth Niketan, Dr. Charat Singh Colony Road, Andheri (East) Mumbai 400093 has applied for mutation under section 96 of L.R.C. 1968 to include her husband name Ramiro D.S.A. Cabral in occupant column of Sy. No. 92/3, 92/8 and 92/4 of Village Camurlim as Co-occupant as per order dated 28-04-2014 in Inventory Proceeding No. 158/2013/F passed in the Court of the Civil Judge Junior Division F at Mapusa, Goa.

Whereas, the notices in Form no. X were sent to all the interested parties by registered Ad. However some notices could not be served and returned unserved with postal remark expired, incomplete address, house locked, not known, insufficient address and party out of station etc.

And whereas, the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.

Mapusa, Dated: 15/01/2025

Sd/- Saiesh S. Naik (Seal)

Joint Mamlatdar VI of Bardez Taluka, Mapusa

Xri Vetal Nachinolcar

Nasnolwada, Adavalpal, Bicholim - Goa.

Ref. No. XVN/408/2025 Dated: 19.01.2025

NOTICE

Notice is hereby given to all the capable/eligible **Mahajans of Xri Vetal Nachinolcar, Devasthan, Nasnolwada, Advalpal, Bicholim - Goa,** in accordance with Devasthan rules and regulation that the Ordinary General Body Meeting of Mahajans will be held on **Sunday, 9th February 2025** at **10.30 am,** in the premises of Devasthan, (Devasthan Hall) to discuss and decide on the following agenda:-

Agenda of the Meeting

1. To elect new Managing Committee (Working Committee) by ballot voting, for the period of triennium 2025 to 2028.

All the capable/eligible Mahajans are requested to attend the meeting, along with necessary proof of identity. (Aadhar card/Voters id card/Driving license etc.)

NB. In absence of the quorum, the meeting will be held half an hour later i.e. 11.00 am on the same day and at the same place.

Yours faithfully,
Sd/- Secretary
(**Shri. Chandramohan Vithal Nasnodkar**)
Managing Committee
Xri Vetal Nachinolcar

Place: Nasnolwada, Advalpal.
Date: 19th January 2025

IN THE COURT OF JOINT MAMLATDAR - I OF BARDEZ AT MAPUSA, GOA

Mutation Case No: 99243 Village Bastora

1. Fatima Pereira alias Rohita Roshan Salgaonkar 2. Roshan Salgaonkar, both r/o. H. No. 25/E, Bastora, Bardez, Goa .....Applicant

V/s

1. Anthony Diogo Lopes 2. Dumiana Pereira 3. Guilherme Firdico Piedade Pereira 4. Perpetua A. V. Lopes ....Opponents

PUBLIC NOTICE

To The above named Opponents / Legal Heirs if any / interested parties if any

Whereas the applicants Fatima Pereira alias Rohita Roshan Salgaonkar and Roshan Saleaonkar, both r/o. H. No. 25/E, Bastora, Bardez, Goa, have applied for mutation under section 96 of L.R.C. 1968 to include their names in occupants column under Sy. No. 158/1 (part) of Village Bastora, Taluka Bardez after deleting the name of Guilherme Firstico Pereira, as per Inventory Proceedings No. 317/2020/A, dated 27/02/2024, in the Court of the Civil Judge Senior Division, 'A' Court, at Mapusa, Goa and Deed of Gift, Registration Number BRZ-BK1-05646-2011, CD Number BRZD255, Book 1 Document, dated 07-12-2011, executed Civil Registrar Cum-Sub Registrar of Bardez.

AND WHEREAS, the notices in Form no. X were generated to be served to the party by registered A/D. Party was unserved with postal remark as unserved insufficient address, party expired etc hence to be served through alternative means and so the notices are prayed to be served by way of publication in local newspaper.

AND WHEREAS, the applicant have prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.

Dated: 17/01/2025

Sd/- Devanand P. Prabhu (Seal)

Joint Mamlatdar I of Bardez, Mapusa, Goa

IN THE COURT OF INSPECTOR OF SURVEY & LAND RECORDS, PERNEM, GOA

File No. ISLR / DEM / PER / MOR / 45 / 24 / 87

1. Jairam Naga Shetgaonkar (since deceased Through his legal heir) i. Mr. Sandeep Madhu Shetgaonkar ii. Mr. Preetish Madhu Shetgaonkar iii. Mr. Deepak Madhu Shetgaonkar and iv. Mr. Jairam Madhu Shetgaonkar, All residents of Mardiwada, Morjim, Pernem, Goa .....Applicants

V/s

1. Executive Engineer P.W.D. XIII (R) PWD, Goa 2. Mr. Shripad Sadashiv Lad 3. Mr. Saba Zilu Gawde, Both residents of Morjim, Pernem, Goa 4. Bhikaro Krishna Shetgaonkar (since deceased through his legal heirs) a) Mr. Krishna Bhikaro Shetgaonkar, R/o Munangwada, Morjim, Pernem, Goa 5. Ganesh Nhanu Shetgaonkar, R/o Munangwada, Morjim, Pernem, Goa 6. Valentin Manuel Fernandes, R/o Vithaldaswada, Morjim, Pernem, Goa ....Respondents

PUBLIC NOTICE

WHEREAS, the above named applicant has filed an application dated 17/10/2024 before this Court under section 114 of Land Revenue Code 1968, for Demarcation of property surveyed under Survey no. **187/2** of **Morgim** village of Pernem Taluka.

AND WHEREAS, the applicant Jairam Naga Shetgaonkar, vide application dated 15/01/2025 submit that the notices sent through Reg. AD to the respondents nos. 2, 3, 4, 5 and 6 are returned back from the Post Authority with the endorsement "Not Known"/"Door locked". The applicant states that he is unaware about any addresses of the unserved respondent/their legal heirs and hence prayed for substitute service of notice by serving notice through publication in the local daily Newspaper.

Whereas, I am fully satisfied that there is a fit case for such a publication.

Whereas demarcation with respect to Survey no. **187/2** is completed on **12/12/2024**, schedule for hearing the matter is fixed on **04/02/2024** @ 11:30 a.m. and you are requested as an applicant / respondents to remain present in the Court of Inspector of Survey and land Records Pernem Goa, to file you say failing to comply case will be decided in your absence.

Given under my hand and seal of this office on this 20th day of January, 2025.

Sd/- Vinita V. Kambli (Seal)

Inspector of Survey & Land Records, Pernem, Goa

बजाज फायनान्स लिमिटेड

BAJAJ FINSERV

नोंदणीकृत कार्यालय : बजाज फायनान्स लिमिटेड, पुणे-अहमदनगर मार्गाजवळ, विमाननगर, पुणे-411014

शाखा पत्ता : 1 ला मजला, वैगाल इन्व्हेस्टमेंट बिल्डींग, प्लॉट क्र. 13-ए 3, ईडीसी पाटो प्लाझा, पासपोर्ट ऑफिसजवळ, पणजी, गोवा 403001

कब्जा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8(1) सह परिशिष्ट 4 अनुसार)

खाली सही करणारा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या तरतुदींखाली बजाज फायनान्स लिमिटेडचा (बीएफएल) प्राधिकृत अधिकारी आहे आणि सदर कायद्याच्या कलम 13(12) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 3 खाली त्यास प्रदान झालेल्या अधिकारांचा वापर करून त्याने सदर मागणी सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सदर कायद्याच्या कलम 13(2) खाली सदर सूचनेत दिलेल्या कर्जदार-सहकर्जदारांनी सदर रकमेची परतफेड करावी, अशी मागणी सूचना रजिस्टर्ड पोस्टाने (नोटीस) पाठवली होती.

येथे खाली दिलेल्या कर्जदार/गहाणवटदार/हमीदारांना सदर रकमेची परतफेड करण्यात अपयश आल्याने खासकरून कर्जदार गहाणवटदारहमीदार आणि तमाम लोकांना याद्वारे नोटीस देण्यात येते की, खाली सही करणाऱ्याने सदर कायद्याच्या कलम 13(4) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8 खाली मला प्रदान झालेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली वर्णिलेल्या मलमत्तेचा प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.

खासकरून कर्जदार व तमाम लोकांना याद्वारे इशारा देण्यात येतो की त्यांनी या मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि त्यांनी केलेला असा कोणताही व्यवहार करू नये आणि या मालमत्तेबाबतचा असा कोणताही व्यवहार बजाज फायनान्स लिमिटेडचा भार असलेली येथे खाली दिलेली रक्कम व कंत्राटी दराने त्यावरील व्याजासहितच्या रकमेच्या भारास लागू होईल.

सदर मालमत्ता पुन्हा मिळवण्यासाठी उपलब्ध वेळेसंबंधी सदर कायद्याच्या कलम 13 मधील उपकलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

कर्ज खाते क्र. कर्जदार/ गहाणवटदार/हमीदाराचे नाव	सुरक्षित स्थावर मालमत्तेचे वर्णन	मागणी सूचना तारीख व रक्कम / ताबा घेतल्याची तारीख
411एलएपी17058289 सुखदेव छत्रसिंग भंडारी (कर्जदार) इंदिरासुखदेव भंडारी (सह-कर्जदार) दोघेही राहणार : एफ क्र. एस-3, बालाजी मॅन्शन, शीतल बार अँड रेस्टॉरंटचेवर, वारखंडे, फोंडा, गोवा-40401	सर्व्हे क्र. 24/26 आणि 27/1, तालुका फोंडा, उत्तर गोवा-403401 येथील वारखंडे पोईकिन या नावाच्या मालमत्तेवर बांधलेल्या बालाजी मॅन्शन 2 या बिल्डींगमधील 23.45 चौ.मी. क्षेत्रफळाचा तळमजल्यावरील गाळा क्र. एलजी-3 या मालमत्तेचा संपूर्ण भाग, चतु:सीमा : उत्तरेस : गाळा क्र. एलजी-4, पूर्वेस : बालाजी मॅन्शन बिल्डींग 1, पश्चिमेस : 6.00 मी. रुंद रस्ता, दक्षिणेस : गाळा क्र. एलजी-2 आणि सर्व्हे क्र. 24/26 आणि 27/1, तालुका फोंडा, उत्तर गोवा-403401 येथील वारखंडे पोईकिन या नावाच्या मालमत्तेवर बांधलेल्या बालाजी मॅन्शन 2 या बिल्डींगमधील 37.50 चौ.मी. क्षेत्रफळाचा तळमजल्यावरील गाळा क्र. एलजी-4 या मालमत्तेचा संपूर्ण भाग, चतु:सीमा : उत्तरेस : गाळा क्र. एलजी-5, पूर्वेस : बालाजी मॅन्शन बिल्डींग 1, पश्चिमेस : 6.00 मी. रुंद रस्ता, दक्षिणेस : गाळा क्र. एलजी-3	30/10/2024 दि. 02/11/24 रोजी रु. 60,71,227/- (रु. साठ लाख एक्काहतर हजार दोनशे सत्तावीस फक्त) / ताबा घेतल्याची तारीख 16/01/2025

दिनांक : 17.01.2025
ठिकाण : गोवा

सही/- प्राधिकृत अधिकारी
बजाज फायनान्स लिमिटेड

पार्से : चावदेवाडा येथील सरकारी प्राथमिक विद्यालयात वस्तूंचे वाटप करताना प्रभुदेसाई फाऊंडेशनचे संस्थापक देवेंद्र प्रभुदेसाई. सोबत अन्य मान्यवर

पार्से प्राथमिक शाळेत प्रभुदेसाई फाऊंडेशनचे वस्तूंचे वाटप

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २० : पार्से येथील प्रभुदेसाई फाऊंडेशनतर्फे चावदेवाडा सरकारी प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप फाऊंडेशनचे संस्थापक देवेंद्र प्रभुदेसाई यांच्याहस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी शालेय उपक्रमात सक्रिय तसेच अभ्यासात एकग्रतेने लक्ष घालून यश प्राप्ती करण्याची गरज आहे. प्रभुदेसाई फाऊंडेशन नेहमीच विध्यार्थी व व्यवस्थापनाच्या पाठीशी सदोदित सहकार्याची भूमिका घेऊन कार्यरत आहे,सहकार्य